विना सहकार नाही उद्धार !
पारिजात
को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.
नवी मुंबई

स्थापना सन १९९७

# पारिजात

## को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.







आपल्या कोणत्याही वेळेला
आमची खात्रीची साथ ..

## ७ वा वार्षिक अहवाल

सन २००३-२००४

# आपले ध्येय

एक बलवान अशी संघटना निर्माण करणे की,
ज्यामध्ये सुविद्य, सिद्धांतनिष्ठ, समर्पित नेतृत्व असेल.
जे सहकारी वातावरण सुधारण्यास आणि त्याद्वारे
देशातील सहकारी चळवळ सुधारण्यात
व वाढ करण्यासाठी
प्रभावी भूमिका निभावू शकेल व
प्रत्यक्षात निभावील.



संस्थेचे अध्यक्ष

**श्री. कैलास विठ्ठल खोपडे**

# पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

## • विद्यमान संचालक मंडळ •



श्री. दशरथ आश्रु बडदे

उपाध्यक्ष



श्री. बाळासाहेब विश्वास ताकवले

सचिव



श्री. कृष्णा पांडुरंग धुमाळ

खजिनदार



श्री. दिपक शंकर टेळे

संचालक



श्री. श्रीपती शंकर गरुड

संचालक



श्री. शंकर राजमल पुली

संचालक



सौ. मंदा ज्ञानदेव खोपडे

संचालिका



श्री. अमृत दा. पाटील

संचालक



श्री. अनंत ना. प्रभाळे

संचालक



श्री. आनंदा बा. आंबवले

स्विकृत संचालक



श्री.एस. आर. ताकवले

व्यवस्थापक

# ★ पुणे (धनकवडी) शाखा उद्घाटन समारंभाचे क्षणचित्रे ★



पुणे शाखा कार्यालयाचे उद्‌घाटन करताना मा. श्री. संजीव नाईक (महापौर-नवी मुंबई महानगरपालिका), प्रमुख पाहुणे मा. श्री. मानसिंग धुमाळ (उपसभापती भोर तालुका) व संस्थेचे पदाधिकारी




गणेश जयंतीचे औचित्य साधुन उद्‌घाटक मा. श्री. संजीव नाईक (महापौर न.मुं.म.पा.) यांना श्रीगणेश मुर्ती भेट देऊन सत्कार करताना अध्यक्ष मा. श्री. कैलास खोपडे



पुणे शाखा कार्यालयास श्री. अशोकराव टेकवडे, अध्यक्ष-पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांनी सदिच्छा भेट दिली. त्याप्रसंगी त्यांचा सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष श्री. कैलास खोपडे.

# पारिजात को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

रजि. नं. टी. एन. ए./टी. एन. ए./आर. एस. आर./सी. आर. ९५१/९७
मुख्य कार्यालय : ए/३/७, सेक्टर - १५, मराठा भवन मार्ग, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.

## सातवी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यांत येते की, पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई या संस्थेची सातवी सर्वसाधारण सभा **शनिवार दि. ३१/७/२००४** रोजी **दुपारी ३.०० वाजता गुरव ज्ञाती भवन, २-सी/३, सेक्टर ९-ए, बस डेपोजवळ, वाशी, नवी मुंबई** या ठिकाणी संस्थेचे अध्यक्ष श्री. कैलास विठ्ठल खोपडे यांच्या अध्यक्षतेखाली खालील नमूद केलेल्या विषयाचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून कामकाजात भाग घ्यावा ही विनंती.

### सभेपुढील विषय

१) दि. १०/०८/२००३ रोजी दुरुस्ती झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दि. ३१ मार्च २००४ अखेरचा कार्यकारी मंडळाने सादर केलेला ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रकास मंजूरी देणे.

३) २००३-२००४ नफा विभागणीस मंजूरी देणे.

४) सन २००३-२००४ च्या लेखापरिक्षण अहवालास मंजूरी देणे.

५) सन २००४-२००५ सालाकरिता अंतर्गत हिशेब तपासणीसाची नेमणूक करुन मानधन ठरविणे.

६) सन २००४-२००५ च्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.

७) पोटनियम दुरुस्ती स्विकारुन मंजूरी देणे.

७) संस्थेस स्वमालकीचे प्रशासकीय कार्यालय घेणे बाबत मंजूरी देणे.

८) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या वतीने

ठिकाण : नवी मुंबई

**श्री. बाळासाहेब विश्वास ताकवले**

दिनांक : १/७/२००४

(सचिव)

### विशेष सूचना

१) गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास, ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी ही सभा घेण्यांत येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२) ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील अगर सूचना करावयाच्या असतील त्यांनी नियोजीत सभेच्या तारखेपूर्वी सात दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात लेखी कळविणे आवश्यक आहे.

### कार्यालयीन वेळ

| | | | |
|---|---|---|---|
| **सोमवार ते शुक्रवार** | - | सकाळी | १०.०० ते १.३० |
| | - | दुपारी | ०२.३० ते ६.०० |
| **शनिवार** | - | सकाळी | १०.०० ते १.३० |

अध्यक्षीय मनोगत

# सकल जनांची आधारू...

१९९७ साली रुजवलेली कल्पना प्रत्यक्षात अवतरली, विस्तारली, बहरली, तिला लोक मान्यता मिळाली व प्रतिष्ठा प्राप्त झाली. जनसामान्यांपासून ते बुद्धीवंतांपर्यंत सर्व स्तरावर नावाजलेली, सर्वांच्या कौतूकास पात्र ठरलेली "पारिजात संस्था" प्रगतीचे नवनवीन टप्पे यशस्वीरित्या पार पाडत आहे. हे सर्व संस्थेची स्वच्छ प्रतिमा, संस्थेचे भागधारक, ठेवीदार, खातेदार यांचा "पारिजात" वर असलेला विश्वास, प्रेम याचेच द्योतक आहे असे मी मानतो.

'पारिजात' ने नवी मुंबई जिल्ह्याच्या सीमा ओलांडुन पहिले पाऊल पुणे शहरात ठेवले असून आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे तेथे सुद्धा संस्थेवर प्रेमाचा वर्षाव झाला असून संस्थेस भरघोस प्रतिसाद मिळत आहे. याबद्दल मी आमच्या पुणेकर सभासदांचे मन:पुर्वक आभार मानतो. 'पारिजात' संस्थेच्या अन्य शाखाप्रमाणेच पुणे (धनकवडी) शाखा सुद्धा संपूर्ण संगणकीकृत व सुसज्ज अशी आहे.

आज बॅकींग क्षेत्रात तीव्र स्पर्धा आहे. या स्पर्धेत केवळ टिकून राहणे हे 'पारिजात' चे ध्येय नाही तर सर्वांच्या एक पाऊल पुढेच राहण्याचे आमचे उद्दिष्ट आहे व या उद्दीष्टपूर्तीसाठी आम्ही जे जे बदल आवश्यक आहे ते करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहोत. पतसंस्थाची कालची व आजची कार्यपद्धती यामध्ये आमूलाग्र बदल झाले असून सहकार खात्याचे बदलते धोरण, लेखापरिक्षणातील व इतर अंतर्गत नियंत्रणाबाबतची कडक धोरणे यामुळे आपणांसर्वांना बदलणं अपरिहार्य आहे. यासाठी संस्थेत खाते उघडण्यापासून ते कर्ज घेण्यापर्यंत प्रत्येक गोष्टींसाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता आपणाकडून होणे अनिवार्य आहे तेव्हा सहकार्य करावे.

आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरून ग्राहकसेवेचा उत्तम दर्जा राखत सभासद ग्राहकांना परिपूर्ण व संतुष्ट सेवा देण्याचा व आपुलकी, जिव्हाळा जपण्याचा आम्ही सदैव प्रयत्न करत आहोत या कामी मला बॅकींग क्षेत्राचा अनुभव असलेले व सामाजिक जाण असणारे माझे सेवाभावी सहकारी संचालक, अधिकारी, प्रशिक्षित व कार्यतत्पर कर्मचारी वर्ग, दै. ठेव प्रतिनिधी यांचे अत्यंत सहकार्य लाभले. या साऱ्यांचे नेतृत्व करताना मी एक तत्व नेहमी आचरणात आणतो ते म्हणजे "नेतृत्व हे दोरीसारखे असते ते ढकलून पुढे जात नाही तर पुढे जाऊन ते ओढावे लागते." यामध्ये आजपर्यंत यशस्वी झालो आहे. यापुढेही आपल्या सर्वांच्या सहकार्याने ही जबाबदारी पार पाडेन.

दादर विभागातील संस्थेच्या सभासदांची 'दादर शाखेची' मागणी अहवाल वर्षी पूर्ण करू शकलो नाही. परंतू ही मागणी आता पूर्ण झाली असून दि. १२ जून २००४ पासून दादर शाखा कार्यान्वयीत झाली असून यामुळे आमच्या मुंबईकर सभासदांना संस्थेच्या सुविधा अधिक तत्पर झाल्याचा आम्हांस विशेष आनंद होत आहे.

सभासदांच्या अचानक उदभवणाऱ्या अडचणींमध्ये सहाय्यभूत होणारी सोने तारण कर्ज सुविधा संस्थेने सुरु केली असून सभासदांनी त्याचा अवश्य लाभ घ्यावा. तसेच आपल्या संस्थेच्या सभासदांसाठी डिमांड ड्राफ्टची सुविधा देशातील बहुतांश महत्वाच्या शहरांसाठी उपलब्ध करण्यात आली असून त्याचा लाभ घ्यावा.

पारिजात संस्थेचे स्वमालकीचे सुसज्ज प्रशासकीय कार्यालय ज्यामध्ये सभागृह, प्रशिक्षण हॉल असावे अशी माझी मनोमनी इच्छा आहे. आजवर आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे आमचे सर्व संकल्प पूर्णत्वास गेले आहेत. प्रशासकीय कार्यालयाचा संकल्पसुद्धा लवकरच आगामी वर्षात पूर्ण होईल अशी आशा वाटते.

पारिजातचा सडा सर्व ठेवीदार, भागधारक, कर्जदार हितचिंतक यांच्या अंगणात पडो व आपणासर्वांचे आयुष्य सुगंधी व प्रसन्न करो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना !

**श्री. कैलास विठ्ठल खोपडे**
*अध्यक्ष*

# ७ वा वार्षिक कार्य अहवाल

## सन २००३-२००४

**सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,**

संस्थेच्या संचालक मंडळाच्यावतीने दिनांक ३१ मार्च २००४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा ७ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा - तोटा पत्रक आपणासमोर सादर करताना आम्हांस कर्तव्यपूर्तीचा विशेष आनंद होत आहे. दरवर्षीप्रमाणे या वर्षीसुद्धा संस्थेने आपल्या प्रगतीची वाटचाल ठरवुन दिलेल्या उद्दिष्टानुसार चालू ठेवलेली आहे.

अहवाल वर्षात संस्थेने केलेल्या प्रगतीची व कामकाजाची कल्पना पुढील आकडेवारीवरून येईल.

## संस्थेची वित्तीय स्थिती :-

रु. लाखात

| तपशील | ३१/०३/२००३ रु. | ३१/०३/२००४ रु. | वाढ रु. | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | ७३.९६ | ७७.०४ | ३.०८ | ४.१६ |
| राखीव व इ. निधी | ३४.२० | ४८.३३ | १४.१३ | ४१.३२ |
| सभासद ठेवी | ४६८.५६ | ६५१.२१ | १८२.६५ | ३८.९८ |
| गुंतवणुक | १२५.४७ | १९२.१३ | ६६.६६ | ५३.१२ |
| सभासद कर्जे | ४४२.७३ | ५६४.१७ | १२१.४४ | २७.४२ |
| खेळते भांडवल | ६५१.३८ | ८७७.१८ | २२५.८० | ३४.६६ |

पारिजात संस्थेने सहकारी तत्वाचा पुर्ण सन्मान राखून आपल्या आर्थिक व सामाजिक सेवेने आम जनतेमध्ये विश्वासाची, सहकाराची व विकासाची भावना निर्माण केली आहे. सभासद ठेवीदार व हितचिंतक यांच्या सहाय्याने व नि:स्वार्थीपणे केलेल्या अव्याहत परिश्रमामुळे संस्थेने आपल्या प्रगतीची उद्दिष्टे साध्य केली व आदर्श आर्थिक धोरणे जोपासली असून केलेली प्रगती नेत्रदिपक आहे याबद्दल आपले दुमत होणार नाही यांची आम्हाला खात्री आहे.

## संस्थेच्या प्रगतीचा विस्तृत आढावा



### सभासद :- ३६९१

गतवर्षी संस्थेचे ३३३६ सभासद होते, अहवाला वर्षात ५३३ नवीन सभासद झाले आणि १७८ सभासदांनी राजीनामा दिल्यामुळे अहवाल वर्षाअखेर ३६९१ एवढी सभासद संख्या झाली आहे.



### भाग भांडवल :- रु. ७७.०४ लाख

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रूपये पाच कोटी असून गतवर्षाअखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रु. ७३,९६,५५०/- इतके होते. त्यामध्ये अहवाल वर्षात रू. ३,०७,२५०/- ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २००४ अखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रु. ७७,०३,८००/- इतके आहे.



## ☞ गंगाजळी व इतर निधी :- रु. ४८.३३ लाख

संस्थेची जनमानसात असलेली विश्वासार्हता ही संस्थेच्या स्वनिधीवर अवलंबून असते. निधी जेवढा जास्त तितका संस्थेचा पायाही मजबूत असतो, यानुसार संस्थेने राखीव निधी, इमारत निधी, संशयित व बुडीत कर्ज निधी, थकित व्याज निधी, लाभांश समाणिकरण निधी, सभासद कल्याणनिधी, धर्मदाय निधी, सेवक कल्याण व प्रशिक्षण निधी, तसेच सेवक ग्रॅज्युईटी निधी उभारलेले आहेत.

गतवर्षीचे संस्थेचे एकुण स्वनिधी रु. ३४,२०,१९०/- होते त्यामध्ये अहवाल साली रु. १४,१२,७५५/- ने वाढ होवुन वर्षा अखेरीस एकुण स्वनिधी रुपये ४८,३२,९४५/- इतके झाला आहे.



## ☞ ठेवी :- रु. ६५१.२२ लाख

संस्थेच्या ठेवी संकलनामध्ये अहवाल वर्षात नेत्रदीपक वाढ झाली आहे संस्था देत असलेली ग्राहक सेवा तसेच आपणा सर्वाचा दृढ विश्वास यामुळेच हे साध्य होवू शकले.

गतवर्षाअखेर ठेवी रु. ४,६८,५६,२४८/- होत्या त्यामध्ये रु. १,८२,६५,४८४/- ने वाढ होवुन दि. ३१ मार्च २००४ अखेर संस्थेच्या एकुण ठेवी रु. ६,५१,२१,७३२/- झाल्या असुन ठेवी वाढीचे प्रमाण ३९% इतके आहे.

संस्थेने ठेवीदारांकरिता विविध आकर्षक ठेव योजना राबविल्या असुन प्रत्येक सभासदांनी ठेव योजनेत पैसे गुंतवूण लाभ घ्यावा. संस्थेच्या विविध योजनांमध्ये अहवाल वर्षात खालीलप्रमाणे ठेवी जमा झालेल्या आहेत व त्यांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

| ठेवीचा प्रकार | सन २०००-०१ | सन २००१-०२ | सन २००२-०३ | सन २००३-०४ |
|---|---|---|---|---|
| बचत ठेव | ६७,१९,६६७.०० | ६४,२२,१२६.०० | ७२,७८,१७५.०० | ९५,१७,४६३.०० |
| आवर्त ठेव | ८,२९,३९९.०० | ९,५१,०२६.०० | १०,५२,९११.०० | १५,५७,६३७.०० |
| दैंनदिन बचत ठेव | ५१,७३, ९३२.०० | ७२,९३,३८३.०० | ८६,८१,२३३.०० | १,१०,१५,१८४.०० |
| दामदुप्पट ठेव | ४५,२३,९२०.०० | ७२,९५,८३८.०० | ९४,४५,२८५.०० | १,१७,९६,९७५.०० |
| अल्प मुदत ठेव | ११,३६,७५०.०० | २०,११,०२२.०० | ३०,२७,८२३.०० | ६४,७१,५२९.०० |
| मुदत ठेव | २८,४०,९५२.०० | ४७,३०,०४४.०० | ६१,३८,०२९.०० | ७०,१५,७५४.०० |
| मासिक प्राप्ती ठेव | १८,३२,०००.०० | २५,६३,५००.०० | ३१,५७,५००.०० | ४४,१८,०००.०० |
| पारिजात बक्षीस ठेव १९९८ | ९,२४,०००.०० | ७,०४,५००.०० | ५,५१,५००.०० | ५,११,०००.०० |
| पारिजात बक्षीस ठेव २००० | ३२,०१,०००.०० | २९,७९,०००.०० | २६,२८,०००.०० | २४,१३,०००.०० |
| सिद्धी ठेव २००१ | - | ३०,७८,०००.०० | २६,८६,०००.०० | २४,८२,०००.०० |
| सभासद ठेव | - | - | १५,६२,३७१.०० | ३५,५१,४४४.०० |
| शुभकार्य ठेव | - | - | ६,४७,३४६.०० | २४,५०,७४६.०० |
| संकल्प सिद्धी ठेव | - | - | - | १९,२१,०००.०० |
| एकूण रु. | २,७१,८१,६२०.०० | ३,८०,२८,४३९.०० | ४,६८,५६,२४८.०० | ६,५१,२१,७३२.०० |




## ☞ गुंतवणूक :- रु. १९२.१४ लाख

संस्थेने महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याने निधीच्या गुंतवणुकीबाबत घालून दिलेल्या सर्व नियमांचे योग्य प्रकारे पालन केलेले आहे. गतवर्षी संस्थेची गुंतवणुक रू. १,२५,४७,१३०/- एवढी होती अहवाल वर्षात त्यात रु. ६६,६६,८१८/- ने वाढ होवून एकुण गुंतवणुक रु. १,९२,१३,९४८/- एवढी आहे. या वाढीचे शेकडा प्रमाण ५३% एवढे आहे.

| गुंतवणूक तपशील | रक्कम रुपये |
|---|---|
| दि ठाणे जिल्हा. मध्य. सह. बँक लि. भाग | १०००.०० |
| महा. राज्य सह. पतसंस्था फेडरेशन लि. भाग | ३०००.०० |
| राखीव निधी (रिझर्व फंड) | १०,३०,८५०.०० |
| संशयित व बुडित कर्ज निधी | ४,१०,०००.०० |
| थकित व्याज निधी | ३,५०,०००.०० |
| लाभांश समानिकरण निधी | १,२५,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | २१,०००.०० |
| सेवक ग्रॅज्युईटी व कल्याण निधी | ४४,०००.०० |
| कर्मचारी भविष्य निर्वाह निधी | ९७,०००.०० |
| धर्मदाय निधी | ५९,०००.०० |
| मुदत ठेव गुंतवणूक बँक | १,७०,७३,०९८.०० |
| एकूण रु. | १,९२,१३,९४८.०० |



## ☞ कर्जे :- रु. ५६४.१८ लाख

सहकार खात्याच्या मागदर्शक सुचनांनुसार छोटया व मोठया व्यावसायिक, व्यापारी व नोकरदार सभासदांच्या आर्थिक उन्नीतीसाठी व त्यांच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यांसाठी आपली संस्था सदैव कटिबद्ध आहे म्हणुनच कर्ज वाटपच्यावेळी सर्वसामान्य सभासदांना आम्ही नेहमी अग्रक्रम दिलेला आहे व त्यांना प्राधान्याने कर्ज पुरवठा करून सभासदांचे राहणीमान उंचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कर्जदारांनी कर्जाची नियमित परतफेड करावी अशी संस्थेची अपेक्षा असते.

गतवर्षाअखेर संस्थेचे रु. ४,४२,७३,५७३/- कर्ज येणे बाकी होते अहवाल साला मध्ये संस्थेने सभासदांना रु. ५,६४,६५,३६२/- नव्याने कर्ज वाटप केले असून रु. ४,४३,२१,४२४/- कर्ज वसूल झालेले आहे. अहवालवर्षाअखेरीस एकुण रु. ५,६४,१७,५११/- कर्ज येणे बाकी आहे.



## ☞ खेळते भांडवल :- रु. ८७७.१८ लाख

गतवर्षाअखेर संस्थेचे खेळते भांडवल रु. ६५१.३८ लाख एवढे होते. अहवालवर्षी संस्थेने सर्व क्षेत्रात भरीव कामगिरी केल्यामुळे खेळते भांडवल ३५% प्रमाणे रु. २२५.८० लाखाने वाढुन रु. ८७७.१८ लाख इतके झाले आहे.



## नफा :- रु. १२.६२ लाख

अहवालसाली एकुण खर्च व नियमानुसार करावया लागणाऱ्या तरतुदी वजा जाता रु. १२,६१,७३८.५० इतका निव्वळ नफा झालेला असून गतवर्षीचा शिल्लक नफा रु. २८९/- मिळुन एकूण नफा रु. १२,६२,०२७.५० आहे. सदर नफ्याची विभागणी पुढीलप्रमाणे करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी. ही नम्र विनंती.

| तपशील | रक्कम रुपये | |
|---|---|---|
| राखीव निधी (२५% प्रमाणे) | रु. | ३,१५,५०७.०० |
| लाभांश (१०% प्रमाणे) | रु. | ७,३१,६५५.०० |
| थकित व्याज कर्ज निधी | रु. | ७५,०००.०० |
| इमारत निधी | रु. | ७५,०००.०० |
| लाभांश समानिकरण निधी | रु. | २०,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | रु. | १०,०००.०० |
| कर्मचारी प्रशिक्षण निधी | रु. | १५,०००.०० |
| दशकपुर्ती सोहळा निधी | रु. | ११,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक नफा | रु. | ८६५.५० |
| एकूण | रु. | १२,६२,०२७.५० |

## विद्यार्थी गुणगौरव सोहळा :-



सालाबादप्रमाणे यंदाही संस्थेच्या सभासदांच्या पाल्यासाठी विद्यार्थी गुणगौरव समारंभाचे दिनांक २१ ऑगस्ट २००३ रोजी मराठा भवन सभागृह, सेक्टर १५, वाशी, नवी मुंबई येथे आयोजन करण्यात आले होते. समारंभात सन्माननीय सभासदांच्या पाल्यांना प्रशस्तीपत्रक व पारितोषिके देवुन गौरविण्यांत आले.

नवी मुंबई महानगरपालिकेचे सभागृह नेते मा. श्री. श्याम महाडिकसाहेब हे समारंभाचे प्रमुख पाहुणे होते, तसेच नवी मुंबई विद्यालयाचे अध्यक्ष मा. श्री. कृष्णकांत शिंदे हयांनी तसेच जेष्ठ शिक्षक श्री. विजय पाटील सर यांनी शिक्षणविषयक थोर व मोलाचे विचार मांडले.

आजच्या या शैक्षणिक क्षेत्रातील स्पर्धेच्या युगात विद्यार्थी मित्रासाठी यापुढेही अनेक थोर विचारवंत तसेच शिक्षणतज्ञांचे मार्गदर्शन व्हावे, यासाठी संस्था प्रयत्नशील राहणार आहे. विद्यार्थी मित्रांना यशश्री मिळण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यास संस्था असे समारंभ दरवर्षी आयोजित करत आहे.

## आमची गुणवान मुले

| अ. नं. | पाल्याचे नांव | टक्केवारी | अ. नं. | पाल्याचे नांव | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | **इयत्ता दहावी** | | | **इयत्ता नववी** | |
| १) | शिंदे मेघा नारायण | ९०.४०% | १) | शेवाळे प्रणिता ज्ञानदेव | ८९.६०% |
| २) | मालुसरे शुभांगी सर्जेराव | ८२.००% | २) | पवार अक्षय गजानन | ६९.८९% |
| ३) | बरदाडे सागर निवृत्ती | ८१.७३% | ३) | सनस वैभव ज्ञानोबा | ६६.२७% |
| | **इयत्ता आठवी** | | | **इयत्ता सातवी** | |
| १) | मोरे गणेश साहेबराव | ७८.८६% | १) | शेवाळे शलाका ज्ञानदेव | ९०.२८% |
| २) | वैश्य अर्चना राजकुमार | ७८.००% | २) | कोल्हे प्रतिक्षा विनोद | ८४.००% |
| ३) | पाटिल वृंदा रंगराव | ७२.५०% | ३) | धुमाळ विवेक विद्याधर | ८३.४१% |
| | **इयत्ता सहावी** | | | **इयत्ता पाचवी** | |
| १) | छेडा ऋषभा रमेश | ८९.७०% | १) | धुमाळ श्रुती विद्याधर | ८७.००% |
| २) | ठाकुर मयुर भगवान | ८४.००% | २) | कानडे विशाल सुनिल | ८२.००% |
| ३) | यादव हेमांगी जयसिंग | ८२.०३% | ३) | उन्हावणे अर्चना सखाराम | ७९.६६% |
| | **इयत्ता चौथी** | | | **इयत्ता तिसरी** | |
| १) | कोल्हे प्रतिक विनोद | ८९.५०% | १) | कुंभारकर सुभाष आबासाहेब | ९१.००% |
| २) | टेळे जयदिप दिपक | ८९.००% | २) | पाटिल प्रियांका अमृत | ९०.२५% |
| ३) | झेंडे पल्लवी चंद्रकांत | ८७.५०% | ३) | नेहरकर विकास विलास | ८९.०५% |
| | **इयत्ता दुसरी** | | | **इयत्ता पहिली** | |
| १) | विचारे समिता नरेश | ९६.०५% | १) | टेळे दिपाली दिपक | ९७.००% |
| २) | भोसले सोनाली सुरेश | ९६.००% | २) | पासलकर अथर्व बिपीन | ९५.००% |
| ३) | जाधव सौरव दिपक | ९५.७५% | ३) | चौहान राणी विजय | ९३.००% |

## पारिजात विद्यार्थी गुणगौरव व शिष्यवृत्ती योजना

सन २००३-२००४ सालासाठी देण्यात येणाऱ्या पारिजात शिष्यवृत्ती व पारितोषिकासाठी छापील अर्ज संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध असून सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी इयत्ता १ली ते १० वी पर्यंतच्या ७०% पेक्षा अधिक गुण मिळालेल्या पाल्यांसाठी विहीत नमुन्यातील अर्ज गुणपत्रिकेच्या झेरॉक्ससह दि. १६ ऑगस्ट २००४ पूर्वी संस्थेच्या संबंधीत शाखेत सादर करावेत.



## ☞ प्रशिक्षण शिबीर :-

मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशान्वये सहकारी संस्थेच्या एकूण कर्मचाऱ्यांपैकी दरसाल किमान २५% कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे बंधनकारक असून जर संस्थेने असे प्रशिक्षण न दिल्यास लेखा परिक्षणामध्ये संस्था 'अ' वर्गास पात्र असेल तरीही 'अ' वर्ग देऊ नये असे स्पष्ट आदेश दिले आहेत. सहकारी संस्थांच्या गुणात्मक वाढीसाठी शासनाने हा एक चांगला निर्णय घेतला असून आपली संस्था सुद्धा या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करत आहे व स्वत: संचालकांसह कर्मचारी व ठेवप्रतिनिधी यांना प्रशिक्षण देत आहे. सालाबादप्रमाणे यंदाही संस्थेने दिनांक २३ व २४ ऑक्टोबर २००३ रोजी सिल्वर ओक फार्म हाऊस, नागांव, उरण जिल्हा रायगड येथे कर्मचारी व ठेव प्रतिनिधी यांचेसाठी प्रशिक्षण शिबीराचे आयोजन केले होते. सदर शिबिरास श्री. विजय मोरे यांनी 'सहकार कायदे' तसेच 'सहकारी संस्थासाठी असलेल्या आदर्श उपविधी' या विषयावर प्रशिक्षण दिले. तसेच रायगड जिल्हा सहकारी संघाचे संचालक मा. श्री. नानासाहेब पाटील यांनी राज्यपातळीवरील 'सहकारी संघाचे कार्य' विश्लेषण व चालू घडामोडीं विषयी मौलीक मार्गदर्शन केले.

ठाणेजिल्हा सहकारी बोर्ड, कल्याण यांचेतर्फे घेण्यांत येणाऱ्या विविध सेवक प्रशिक्षण वर्गामध्ये संस्थेचे कर्मचारी सहभागी झाले तसेच दै. ठेव प्रतिनिधी यांना सुद्धा वेळोवेळी संस्थेतर्फे प्रशिक्षण देण्यात आले.

आजच्या स्पर्धात्मक युगात संस्थेच्या सभासद, ठेवीदार, खातेदार यांना तत्पर व कार्यक्षम ग्राहकाभिमुख सेवा देणे हाच मुख्य उद्देश समोर ठेवून संस्था अशा प्रशिक्षण शिबीराचे आयोजन यापुढेही करणार आहे.



## ☞ लेखापरिक्षण :-

संस्थेचे सन २००३-०४ या आर्थिक वर्षाची शासकीय हिशेब तपासणी श्री. विलास रा. जाधव यांनी केली असून संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले असून संस्थेस ऑडीट वर्ग 'अ' प्रदान केला आहे.

संस्थेचे सन २००३-०४ या आर्थिक वर्षाची अतंर्गत हिशोब तपासणी श्री. रतिकांत आर. पिंगळे, चार्टर्ड अकौंटंट यांनी केलेली असून त्यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.



## ☞ उल्लेखनीय बाबी :-

संस्थेने अहवाल वर्षात जे उल्लेखनीय उपक्रम राबविले त्याचा थोडक्यात परामर्ष खालीलप्रमाणे :-

### १) वाढीव कार्यक्षेत्र :-

मागील वर्षी संस्थेचे कार्यक्षेत्र ठाणे जिल्हा होते. अहवाल वर्षी ते वाढवून ठाणे, बृहनमुंबई, रायगड व पुणे या चार जिल्ह्याचे करण्यात आले, यामुळे या चारही जिल्ह्यामध्ये विखुरलेल्या सभासदांना सेवा देण्यास आम्ही सज्ज झालो आहोत.

### २) पुणे (धनकवडी) शाखा उद्‌घाटन :-

अहवाल वर्षी संस्थेने दोन नवीन शाखांना मंजूरी घेऊन त्यापैकी एक पुणे शहरात धनकवडी येथे आपली तिसरी अद्यावत शाखा दिनांक २५ जानेवारी २००४ रोजी कार्यान्वयीत करण्यात आली. या शाखेचे उद्‌घाटन नवी मुंबई महानगर पालिकेचे

महापौर मा. श्री. संजीवजी नाईक यांचे शुभहस्ते करण्यात आले. या समारंभास पुणेकर सभासदांनी उत्तम प्रतिसाद देऊन संस्थेप्रति आपले प्रेम व्यक्त केले.

### ३) डिमांड ड्राफ्ट सुविधा :-

संस्थेने आपल्या सभासदांना डिमांड ड्राफ्ट सुविधा अन्य सहकारी बँकपेक्षा कमी दरामध्ये उपलब्ध करुन दिली आहे. तसेच काही विशिष्ट अटींवर डी.डी., पे ऑर्डर सुविधा सभासदांना घरपोच देण्याची व्यवस्था केलेली आहे, त्याचा अधिकाधिक सभासदांनी लाभ घ्यावा.

### ४) सोनेतारण कर्ज सुविधा :-

सभासदांना अडीअडचणीच्यावेळी त्वरित आर्थिक मदत उपलब्ध व्हावी यासाठी संस्थेने अहवाल वर्षी सोनेतारण कर्ज योजना सुरु केली आहे.



## ☞ आभार :-

संस्थेच्या पुणे शाखेच्या उद्घाटन सोहळ्यास खास वेळ काढून उपस्थित राहिल्याबद्दल नवी मुंबईचे महापौर मा. श्री. संजीवजी नाईक यांचे आम्ही विशेष आभार मानतो.

सहकार क्षेत्रास उत्तम वळण लागावे, सहकार चळवळ बळकट व्हावी यासाठी प्रयत्नशील असलेले महाराष्ट्र राज्याचे सहकार आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोकण विभाग, मा. श्री. विकास रसाळ जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे, मा. श्री. शैलेश कोथमिरे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था पुणे, मा. श्री. सी. एम. साळवी उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे तसेच संस्था कार्यक्षेत्रातील सहकारी खात्याचे विविध पदाधिकारी त्यांचेही संस्था ऋणी आहे.

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड, कल्याण, ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि. तुर्भे, नवी मुंबई को. ऑप. बँक लि., कॉसमॉस को-ऑप. बँक, नॅशनल को-ऑप. बँक, अभ्युदय को-ऑप. बँक, राजर्षी शाहू सहकारी बँक यांचे शाखाधिकारी व कर्मचारी यांची संस्था आभारी आहे.

संस्थेचे २००३-२००४ या आर्थिक वर्षाचे शासकीय लेखापरिक्षक मे. विलास आर. जाधव, अंतर्गत लेखापरिक्षक श्री. आर. आर. पिंगळे, संगणकासाठी मे. कॉमविझार्ड सिस्टम्स् तसेच संस्थेचे कायदेविषयक सल्लागार यांनी संस्थेला आस्थेने मार्गदर्शन केल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

संस्थेच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटणारे संस्थेचे कर्मचारी, दै. ठेव प्रतिनिधी, सभासद व ठेवीदार आणि हितचिंतकांनी दिलेले सहकार्य व प्रोत्साहन यामुळेच संचालक मंडळ यशस्वी वाटचाल करू शकले त्याबद्दल आपणा सर्वांचे पुन्हा मन:पुर्वक आभार मानून आपल्या लोभाची व सहकार्याची वृद्धी व्हावी अशी प्रार्थना करतो.



## ☞ श्रद्धांजली :-

अहवाल सालामध्ये भारतातील जे थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, साहित्यिक, पत्रकार, सैनिक, कलावंत शिक्षणतज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, सहकार तज्ञ, आपल्या संस्थेचे मान्यवर सभासद, ठेवीदार व हितचिंतक दिवंगत झालेले आहेत त्यांना ही सभा नम्रतापूर्वक अभिवादन करून त्या सर्वांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**

आपला सहकारी

**कैलास वि. खोपडे**
अध्यक्ष

## दि. ३१ मार्च २००४ रोजीचे

| सन २००२-०३ रु. पै. | भांडवल व देणी | रु. पै. | सन २००३-०४ रु. पै. |
|---|---|---|---|
| १,००,००,०००.०० | **अधिकृत भाग भांडवल** | | ५,००,००,०००.०० |
| ७३,९६,५५०.०० | **वसूल भाग भांडवल** | | ७७,०३,८००.०० |
| | ७७०३८ भाग प्रत्येकी रु. १००/- प्रमाणे | | |
| | **राखीव व इतर निधी :** | | |
| ६,६६,४४०.०० | राखीव निधी | १०,९३,१००.०० | |
| १८,६५,२२४.०० | इमारत निधी | २४,५४,३५४.०० | |
| ३,१०,०००.०० | संशयित बुडीत कर्ज निधी | ४,१०,०००.०० | |
| ३,५०,०००.०० | थकित व्याज निधी | ५,५०,०००.०० | |
| ९०,०००.०० | लाभांश समानिकरण निधी | १,२५,०००.०० | |
| २७,१७७.०० | सभासद कल्याण निधी | ५६,६४२.०० | |
| ४३,९९९.०० | धर्मदाय निधी | ५३,९९९.०० | |
| २९,०००.०० | सेवक कल्याण निधी | ४४,०००.०० | |
| ९,३५०.०० | सेवक प्रशिक्षण निधी | ७,८५०.०० | |
| २९,०००.०० | सेवक ग्रॅज्युईटी निधी | ३८,०००.०० | ४८,३२,९४५.०० |
| | **सभासद ठेवी :** | | |
| ७२,७८,१७०.०० | बचत ठेव | ९५,१७,४६३.०० | |
| ८६,८१,२३३.०० | दैनंदिन बचत ठेव | १,१०,१९,१८४.०० | |
| १०,५२,९९१.०० | आवर्त ठेव | १५,५७,६३७.०० | |
| ३०,२७,८२३.०० | अल्प मुदत ठेव | ६४,७१,५२९.०० | |
| ६१,३८,०२९.०० | मुदत ठेव | ७०,१५,७५४.०० | |
| ९४,४५,२८५.०० | दामदुप्पट ठेव | १,१७,९६,९७५.०० | |
| ३१,५७,५००.०० | मासिक प्राप्ती ठेव | ४४,१८,०००.०० | |
| ५,५१,५००.०० | पारिजात बक्षीस ठेव - १९९८ | ५,११,०००.०० | |
| २६,२८,०००.०० | पारिजात बक्षीस ठेव - २००० | २४,१३,०००.०० | |
| २६,८६,०००.०० | सिद्धी ठेव - २००१ | २४,८२,०००.०० | |
| ६,४७,३४६.०० | शुभकार्य ठेव | २४,५०,७४६.०० | |
| १५,६२,३७१.०० | सभासद ठेव | ३५,५१,४४४.०० | |
| - | संकल्प सिद्धी ठेव - २००३ | १९,२१,०००.०० | ६,५१,२१,७३२.०० |
| | **इतर देणी व तरतूदी :** | | |
| ५४,४४,८०५.०० | ठेवीवरील देय व्याज | ७८,११,३९०.०० | |
| ३०,९२२.०० | एजंट सिक्युरिटी डिपॉझिट | १६,८२९.०० | |
| ३,८७,१३५.०० | लाभांश देणे | ६,३१,२१०.०० | |
| १,०७५.०० | व्यवसाय कर कर्मचारी | १,४२५.०० | |
| २,१२,८०४.०० | सेवक भविष्य निर्वाह निधी | ३,२८,५१२.०० | |
| २,६४९.०० | आयकर टी. डी. एस. | १,८३३.०० | |
| १,२६,७९२.०० | इतर खर्च देणे | १,१२,९९०.०० | ८९,०४,१८९.०० |
| ६,३८,७९,१७०.०० | पुढील पानावर... | | ८,६५,६२,६६६.०० |

## ताळेबंदपत्रक

| सन २००२-०३ रु. पै. | मालमत्ता व येणी | रु. पै. | सन २००३-०४ रु. पै. |
|---|---|---|---|
| | **रोख व बँक शिल्लक :** | | |
| ५६,३३९.०० | रोख शिल्लक | १,१७,२८२.०० | |
| ५,४६,३५८.०० | दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. | १,२९,९४८.०० | |
| ७,२२,९२१.०० | नवी मुंबई को-ऑप. बँक लि. | १०,९२,५२४.०० | |
| ७,०३,७८६.०० | अभ्युदय को-ऑप. बँक लि. | ५,९८,२१४.०० | |
| ५,७५,४१८.०० | नॅशनल को-ऑप. बँक लि. | १६,०२,२९३.५० | |
| - | कॉसमॉस को-ऑप. बँक लि., वाशी | १,६६,९७२.०० | |
| - | कॉसमॉस को-ऑप. बँक लि., पुणे | ७,४७५.०० | |
| - | राजश्री सह. बँक लि., पुणे | ६,६४,३०४.०० | |
| ११,८०८.०० | युनायटेड वेस्टर्न बँक लि. | - | ४३,७९,०१२.५० |
| | **गुंतवणूक :** | | |
| १,०००.०० | दि ठाणे जि. मध्य. सह. बँक - भाग | १,०००.०० | |
| २,०००.०० | महाराष्ट्र राज्य सह. पतसंस्था फेडरेशन - भाग | ३०००.०० | |
| ६,६५,८५०.०० | दि ठाणे जि. मध्य. सह. बँक - राखीव निधी | १०,३०,८५०.०० | |
| ९०,०००.०० | दि ठाणे जि. मध्य. बँक - लाभांश समा. निधी | १,२५,०००.०० | |
| ३,१०,०००.०० | दि ठाणे जि. मध्य. बँक - संश. व बु. कर्ज निधी | ४,१०,०००.०० | |
| ३,५०,०००.०० | दि ठाणे जि. मध्य. बँक - थकित व्याज निधी | ३,५०,०००.०० | |
| २०,०००.०० | दि ठाणे जि. मध्य. बँक - धर्मादाय निधी | ५९,०००.०० | |
| २१,०००.०० | दि ठाणे जि. मध्य. बँक - सभा. कल्याण निधी | २१,०००.०० | |
| ९७,०००.०० | दि ठाणे जि. मध्य. बँक - भ. निर्वाह निधी | ९७,०००.०० | |
| १४,०००.०० | दि ठाणे जि. म. बँक - कर्म. ग्रॅ. व कल्याण निधी | ४४,०००.०० | |
| ५२,७६,२८०.०० | दि ठाणे जि. म. बँक - मुदत ठेव | ९३,०३,१६५.०० | |
| ३८,००,०००.०० | दि ठाणे जि. म. बँक - आवर्त ठेव | ६,००,०००.०० | |
| १५,००,०००.०० | अभ्युदय को-ऑप. बँक - मुदत ठेव | ५,००,०००.०० | |
| २,००,०००.०० | अभ्युदय को-ऑप. बँक - आवर्त ठेव | २,००,०००.०० | |
| ०.०० | नवी मुंबई को-ऑप. बँक - मुदत ठेव | १२,५०,०००.०० | |
| ०.०० | कॉसमॉस को-ऑप. बँक - मुदत ठेव | ४५,००,०००.०० | |
| ०.०० | नवी मुंबई को-ऑप. बँक - आवर्त ठेव | ७,१९,९३३.०० | |
| २,००,०००.०० | जनकल्याण सह. बँक लि. - मुदत ठेव | - | १,९२,१३,९४८.०० |
| | **कर्जे :** | | |
| ६३,२४,९२६.०० | वैयक्तिक / जामिनकी कर्ज | ५९,१२,७०४.०० | |
| ३,००,७९,४७२.०० | व्यवसाय कर्ज | ३,३९,८४,९६१.०० | |
| २१,९१,३६५.०० | वाहन तारण कर्ज | ३२,९६,९१०.०० | |
| ०.०० | सुरक्षित तारण कर्ज | ६५,३४,९२०.०० | |
| ४८,२०,४९३.०० | ठेव तारण कर्ज | ५७,४३,८०७.०० | |
| ९०,५०५.०० | कर्मचारी वैयक्तिक कर्ज | २,२७,७३२.०० | |
| १,८८,३१९.०० | कर्मचारी वाहन तारण कर्ज | १,३४,३६६.०० | |
| ३,०१,७३८.०० | कर्मचारी घरतारण कर्ज | २,६९,५६०.०० | |
| २,७६,७५५.०० | दैनंदिन ठेव प्रतिनिधी कर्ज | ३,१२,५५१.०० | ५,६४,१७,५११.०० |
| ५,९४,३७,३३३.०० | पुढील पानावर ... | | ८,००,१०,४७१.५० |

## दि. ३१ मार्च २००४ रोजीचे

| सन २००२-०३ रु. पै. | भांडवल व देणी | रु. पै. | सन २००३-०४ रु. पै. |
|---|---|---|---|
| ६,३८,७९,१७०.०० | मागील पानावरुन ... | | ८,६५,६२,६६६.०० |
| १२,५९,१२५.०० | **नफा तोटा खाते :** | | |
| | मागील वर्षाचा शिल्लक नफा | २८९.०० | |
| | अधिक : चालू वर्षाचा नफा | १३,८१,१५९.५० | |
| | | १३,८१,४४८.५० | |
| | वजा : पुणे शाखा तोटा | १,१९,४२१.०० | १२,६२,०२७.५० |
| ६,५१,३८,२९५.०० | एकूण | | ८,७८,२४,६९३.५० |

दिनांक : २८-६-२००४
ठिकाण : वाशी, नवी मुंबई.

श्री. विलास रा. जाधव
प्रमाणित लेखापरिक्षक

श्री. एस. आर. ताकवले
व्यवस्थापक

## ताळेबंदपत्रक

| सन २००२-०३ रु. पै. | मालमत्ता व येणी | रु. पै. | सन २००३-०४ रु. पै. |
|---|---|---|---|
| ५,९४,३७,३३३.०० | मागील पानावरुन ... | | ८,००,१०,४७१.५० |
| | **मालमत्ता :** | | |
| १४,४९,२८०.०० | फर्निचर व फिक्चर्स खाते | २१,८४,०४९.०० | |
| ३,४७,००४.०० | संगणक खाते | ५,३४,३३८.०० | |
| ९३,९१४.०० | वातानुकूलीत यंत्रे खाते | १,२२,०३६.०० | |
| २६,०१२.०० | इलेक्ट्रीक साधन सामुग्री खाते | २७,५१९.०० | |
| ५,७४६.०० | कार्यालय साधन सामुग्री खाते | १३,०२५.०० | |
| १४,१६,५५०.०० | इमारत खाते | १३,४५,७२३.०० | |
| २१,०००.०० | सुलेखा मशिन खाते | १,३७,५००.०० | ४३,६४,१९०.०० |
| | **इतर येणी :** | | |
| ५०,०००.०० | कार्यालय अनामत | २,१०,०००.०० | |
| ६,०५३.०० | एम.टी.एन.एल. अनामत | ६,०५३.०० | |
| २१,२१०.०० | एम.एस.ई.बी. अनामत | २४,२१०.०० | |
| ५,०००.०० | बि.ई.एस.टी. अनामत | ५,०००.०० | |
| १,१७,९१४.०० | स्टेशनरी साठा | १,१३,२६६.०० | |
| ७,३४०.०० | मुद्रांक साठा | ८,२४०.०० | |
| ६३५.०० | ग्रंथालय खाते | ८५८.०० | |
| – | शाखा उद्घाटन खर्च खाते | १,०६,८४०.०० | |
| ९,९७७.०० | आगाउ विमा खाते | ९,७८२.०० | |
| १४,१००.०० | आगाउ सुलेखा मशिन देखभाल खाते | – | ४,८४,२४९.०० |
| | **येणे व्याज :** | | |
| ५,८१,५०१.०० | सभासद कर्जावरील येणे व्याज | ५,३८,४६५.०० | |
| १४,६७,८२६.०० | गुंतवणूकीवरील येणे व्याज | २४,००,४१८.०० | २९,३८,८८३.०० |
| | **ॲडव्हान्स :** | | |
| ५९,९००.०० | दै. ठेव प्रतिनिधी मशिन ॲडव्हान्स | | २६,९००.०० |
| ६,५१,३८,२९५.०० | एकुण | | ८,७८,२४,६९३.५० |

| | | |
|---|---|---|
| श्री. कृष्णा मां. धुमाळ | श्री. बाळासाहेब वि. ताकवले | श्री. कैलास वि. खोपडे |
| खजिनदार | सचिव | अध्यक्ष |

## दि. ३१ मार्च २००४ अखेरचे

| सन २००२-०३ रु. पै. | खर्च | सन २००३-०४ रु. पै. |
|---|---|---|
| ४२,८२,०५९.०० | सभासद ठेवींवरील व्याज | ५२,२५,००७.०० |
| ५,४४,६४१.०० | कर्मचारी पगार, बोनस व भत्ते | ६,६५,१८८.०० |
| ६०,८९३.०० | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व व्याज | ७०,८८०.०० |
| ९,०००.०० | कर्मचारी सेवा निवृत्ती निधी | ९,०००.०० |
| १०,३२,८८४.०० | दैंनदिन ठेव प्रतिनिधी कमिशन | ११,८७,०३४.०० |
| ८२,५००.०० | कार्यालय भाडे | १,१०,२००.०० |
| २,९७,४७४.०० | छपाई व स्टेशनरी खर्च | २,३३,४३६.०० |
| १६,२५०.०० | वार्षिक अहवाल खर्च | ३७,४००.०० |
| ९६,४७७.०० | किरकोळ खर्च | १,५७,६९१.०० |
| १,१८,५५२.०० | वीज खर्च | ९१,०६३.०० |
| ३५,११७.०० | टेलिफोन खर्च | ६५,८०७.०० |
| २७,९४३.०० | प्रवास खर्च | ५१,४५७.०० |
| ४,३१७.०० | विमा खर्च | १५,१२२.०० |
| ९,८११.०० | तार व टपाल खर्च | ४,११०.०० |
| ५२,१४६.०० | कार्यालय दुरुस्ती व देखभाल खर्च | २८,६९३.०० |
| १,८९४.०० | कार्यालय पाणी बिल खर्च | ३,४८६.०० |
| ३,६८२.०० | कार्यालय मालमत्ता कर खर्च | ९,३५१.०० |
| ३५,०००.०० | शासकीय लेखापरिक्षण फी | ४९,८६८.०० |
| २०,०००.०० | अंतर्गत लेखापरिक्षण फी | ३१,६१३.०० |
| १,०००.०० | कायदे सल्लागार फी | ०.०० |
| ५००.०० | व्यवसाय कर खर्च संस्था | ५००.०० |
| १३,१६५.०० | दिवाळी भेट खर्च | ०.०० |
| १५,३३२.०० | पुजा खर्च | ५,९०३.०० |
| ३,७६१.०० | बँक चार्जेस खर्च | ३,२१२.५० |
| १,७८,६५५.०० | अधिकर्ष खाते व्याज (ठाणे बँक) | ४८,४६३.०० |
| ९४,३९९.०० | संगणक दुरुस्ती व देखभाल खर्च | ४०,३६९.०० |
| ३,५०२.०० | शिपाई गणवेश खर्च | ०.०० |
| १०,०००.०० | शिक्षण निधी खर्च | ५,०००.०० |
| ३८,१६१.०० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | १८,२९१.०० |
| ८१००.०० | संचालक सभा भत्ता खर्च | १५,२००.०० |
| ०.०० | निवडणूक खर्च | २३,५१५.०० |
| ०.०० | वाहन स्टिकर्स खर्च | ६,४००.०० |
| ०.०० | थकित व्याज निधी तरतूद | २,००,०००.००० |
| ३,५३,९५६.०० | घसारा | ३,८१,३६५.०० |
| १२,५८,०७५.०० | निव्वळ नफा ताळेबंदपत्रकास वर्ग | १२,६१,७३८.५० |
| ८७,०९,२४६.०० | **एकूण** | १०,०६४,३६३.०० |

दिनांक : २८-६-२००४
ठिकाण : वाशी, नवी मुंबई.

श्री. विलास रा. जाधव
प्रमाणित लेखापरिक्षक

श्री. एस. आर. ताकवले
व्यवस्थापक

## नफा तोटा पत्रक

| सन २००२-०३ रु. पै. | जमा | सन २००३-०४ रु. पै. |
|---|---|---|
| ७६,२८,०५५.०० | सभासद कर्जावरील व्याज | ८५,७५,१५०.०० |
| २७,२७८.०० | कर्ज वसुली चार्जेस जमा | ४८,४७१.०० |
| ५१,८५१.०० | फॉर्म फी, सर्विस चार्जेस इत्यादी | ७२,१४६.०० |
| १५०.०० | लाभांश | १६०.०० |
| १०,०१,९१२.०० | गुंतवणूकीवरील व्याज | १३,६८,४३६.०० |
| ८७,०९,२४६.०० | एकूण | १०,०६४,३६३.०० |

| श्री. कृष्णा पां. धुमाळ | श्री. बाळासाहेब वि. ताकवले | श्री. कैलास वि. खोपडे |
|---|---|---|
| खजिनदार | सचिव | अध्यक्ष |

# अंदाज पत्रक सन २००४ - २००५

| उत्पन्न | अंदाजे उत्पन्न २००३-०४ | प्रत्यक्ष उत्पन्न २००३-०४ | अंदाजे उत्पन्न २००४-०५ |
|---|---|---|---|
| कर्जावरील व्याज | १,०८,००,०००.०० | ८६,७५,१५०.०० | १,२९,००,०००.०० |
| फॉर्म फी, सर्विस चार्ज व इतर उत्पन्न | २,००,०००.०० | १,२०,६१७.०० | ३,५०,०००.०० |
| गुंतवणुकीवरील व्याज व लाभांश | १५,००,०००.०० | १३,६८,५९६.०० | १८,५०,०००.०० |
| एकूण रु. | १,२५,००,०००.०० | १,००,६४,३६३.०० | १,५१,००,०००.०० |

| खर्च | अंदाजे खर्च २००३-०४ | प्रत्यक्ष खर्च २००३-०४ | अंदाजे खर्च २००४-०५ |
|---|---|---|---|
| सभासद ठेवीवरील व्याज | ६०,००,०००.०० | ५२,२५,००७.०० | ८०,००,०००.०० |
| कर्मचारी पगार, बोनस, भ. निवार्ह व. सेवा नि. निधी | ९,९५,०००.०० | ७,४५,०६८.०० | १२,००,०००.०० |
| दैनंदिन ठेव प्रतिनिधी कमिशन | १६,००,०००.०० | ११,८७,०३४.०० | १६,००,०००.०० |
| छपाई व स्टेशनरी खर्च | ४,५०,०००.०० | २,३३,४३६.०० | ४,५०,०००.०० |
| वार्षिक अहवाल खर्च | ४०,०००.०० | ३७,४००.०० | ५०,०००.०० |
| किरकोळ प्रवास, पुजा खर्च | २,७०,०००.०० | २,२३,०५१.०० | ३,२५,०००.०० |
| वीज खर्च, टेलिफोन खर्च, इ. | २,५०,०००.०० | १,५६,८७०.०० | २,३०,०००.०० |
| विमा खर्च | १७,०००.०० | १५,१२२.०० | २५,०००.०० |
| पोस्टेज खर्च | १५,०००.०० | ४,११०.०० | २०,०००.०० |
| देखभाल व दुरुस्ती खर्च | १,२५,०००.०० | २८,६९३.०० | ६०,०००.०० |
| संगणक देखभाल व दुरुस्ती खर्च | १,२५,०००.०० | ४०,३६१.०० | १,००,०००.०० |
| न.मु.म.पा.कर व पाणी बिल, कार्यालय भाडे * | १,१२,५००.०० | १,२१,४३७.०० | ३,००,०००.०० |
| अंतर्गत व शासकीय लेखापरिक्षण फी | ९८,०००.०० | ८१,४८१.०० | १,००,०००.०० |
| कायदे सल्लागार फी व व्यवसाय कर खर्च | १२,५००.०० | ५००.०० | १०,०००.०० |
| बॅक चार्जेस | ५,०००.०० | ३,२१२.५० | ५,०००.०० |
| वार्षिक सभा व संचालक सभा भत्ता खर्च | ७५,०००.०० | ३३,४९१.०० | ६२,०००.०० |
| दिवाळी भेट खर्च व शिपाई गणवेश खर्च | ५५,०००.०० | - | ८,०००.०० |
| निवडणूक खर्च | - | २३,५१५.०० | - |
| थकित व्याज निधी | - | २,००,०००.०० | २,५०,०००.०० |
| शिक्षण निधी | ५,०००.०० | ५,०००.०० | ५,०००.०० |
| अधिकर्ष सवलतीवरील व्याज | २,५०,०००.०० | ४८,४६३.०० | १,५०,०००.०० |
| घसारा खर्च | ६,००,०००.०० | ३,८१,३६५.०० | ६,००,०००.०० |
| नफा | १४,००,०००.०० | १२,६१,७३८.०० | १५,५०,०००.०० |
| एकूण रु. | १,२५,००,०००.०० | १,००,६४,३६३.०० | १,५१,००,०००.०० |

* अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास संचालक मंडळाने मासिक सभेत मंजूरी दिली असुन वार्षिक सभेत सदर खर्चास मंजूरीसाठी शिफारस करत आहे.

# लेखा परिक्षकाचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा कलम ८१ (५-ब) आणि महाराष्ट्र सह. संस्था नियम ६९ अन्वये द्यावयाचा)

मी पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. नवी मुंबई या संस्थेचा सोबत जोडलेला ३१ मार्च २००४ या दिनांकाच्या ताळेबंदाचे व त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या नफा - तोटा पत्रकाचे लेखा परिक्षण केले असून अहवाल करतो की -

१) माझ्या लेखा परीक्षणाच्या उद्देशासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासे मला उपलब्ध झाले आहेत.

२) माझ्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल त्यावरुन संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांच्या नियम १९६० चा कायदा व त्याखालील नियम व संस्थेचे पोट-नियमान्वये अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

३) मी तपासलेला ताळेबंद व नफा - तोटा पत्रक संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकांशी व विवरणाशी मिळते आहेत.

४) माझ्या मते संपूर्ण माहितीप्रमाणे तसेच मला देण्यात आलेल्या खुलासावरुन हे हिशोब महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा १९६० व त्याखाली नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी सर्व माहिती देतात आणि

   १) ताळेबंदाच्या बाबतीत दि. ३१ मार्च, २००४ ची संस्थेच्या परिस्थितीची

   २) नफा - तोटा पत्रकाचे बाबतीत, या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफ्याची लेखा परिक्षण अहवाल विभाग अ, ब, क मध्ये अवलोकनास पात्र राहून सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहे.

५) सदर सहकारी संस्थेकरिता वर्ष २००३-०४ करिता "अ" वर्ग देण्यात आलेला आहे.

**श्री. विलास रा. जाधव**
चार्टर्ड अकौटंट
प्रोप्रायटर
मेंबरशिप नं. ३११०८
प्रमाणित लेखापरिक्षक - बी/१७

दिनांक : २८-०६-२००४
स्थळ : नवी मुंबई.

| संचालक कर्जाचा तपशील | | |
|---|---|---|
| ३१-०३-२००४ अखेर येणे कर्ज | ३१-०३-२००४ अखेर थकबाकी | थकबाकी प्रमाण |
| २४३९०.०० | ००.०० | ००% |

| संचालक नातेवाईक कर्जाचा तपशील | | |
|---|---|---|
| ३१-०३-२००४ अखेर येणे कर्ज | ३१-०३-२००४ अखेर थकबाकी | थकबाकी प्रमाण |
| ३७९३५०.०० | ००.०० | ००% |

# पोटनियम दुरुस्ती

| उपविधी क्र. | अस्तित्वातील शब्द रचना | दुरुस्तीनंतर शब्द रचना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| अ. १.१. अ. | संस्थेचे कार्यक्षेत्र<br>संस्थेचे कार्यक्षेत्र ठाणे, बृहन्मुंबई रायगड व पुणे जिल्हया पुरते मर्यादित राहील. | संस्थेचे कार्यक्षेत्र<br>संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य महाराष्ट्र राज्यापुरते मर्यादित राहील. | बरेचसे सभासद व्यवसाया निमित्त इतरत्र स्थायिक झाल्याने |
| परिशिष्ट 'क-२' १. | सामान्य / वैयक्तिक कर्ज - रु. ३०,०००/- पर्यंत | सामान्य / वैयक्तिक कर्ज - रु. ७५,०००/- पर्यंत | बहुतांश सभासदांचे मागणीमुळे व सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या दि. ५-२-२००४ च्या परिपत्रकानुसार |

# परिशिष्ट - अ

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे नांव | : | पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई - ४०० ७०३. |
| मुख्य कार्यालय | : | अे/३/७, सेक्टर - १५, मराठा भवन मार्ग, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३. |
| नोंदणी दिनांक | : | १४ फेब्रुवारी १९९७ |
| नोंदणी क्रमांक | : | टी.एन.ए./टी.एन.ए./आर.एस्.आर. (सी.आर.) ९५१-९७ |
| कार्यक्षेत्र | : | बृहन्मुंबई, ठाणे, रायगड व पुणे जिल्हा |
| शाखा | : | तीन (मुख्य कार्यालय व्यतिरिक्त तीन शाखा) |
| सभासद संख्या | : | ३६९१ |
| अधिकृत भाग भांडवल | : | रु. ५,००,००,०००.०० |
| वसुल भाग भांडवल | : | रु. ७७,०३,८००.०० |
| राखीव व इतर निधी | : | रु. ४८,३२,९४५.०० |
| ठेवी | : | रु. ६,५१,२१,७३२.०० |
| कर्जे | : | रु. ५,६४,१७,५११.०० |
| बाहेरील कर्जे | : | नाही |
| गुंतवणूक | : | रु. १,९२,१३,९४८.०० |
| लेखापरिक्षण वर्ग | : | 'अ' |
| अहवाल सालातील नफा | : | रु. १२,६१,७३८.५० |
| कर्मचारी वर्ग | : | १९ |
| खेळते भांडवल | : | ८,७७,१७,८५३.५० |

## सभासदांना सूचना

- सभासदाने आपला पत्ता बदलल्यास नवीन पत्त्याविषयी कार्यालयास लेखी सूचना त्वरीत करावी.
- ज्या सभासदांनी आपले वारस नेमले नसतील त्यांनी आपले वारस नेमून घ्यावेत.
- सर्व सभासदांचे लाभांश व भाग दाखले तयार आहेत ते संबंधीत शाखेतून घेऊन जावेत.
- कर्ज मागणी करताना सभेपूर्वी ३ दिवस अगोदर कर्ज मागणी अर्ज संस्थेत जमा करावेत.
- पूर्ण भरलेले व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेले अर्ज कर्ज मंजूर सभेत ठेवले जातील.
- आपण घेतलेल्या कर्जाचे हप्ते वेळेवर भरा व संस्थेस सहकार्य करा.
- प्रत्येक महिन्याच्या शेवटी आपले कर्ज, दैनंदिन ठेव, आर. डी. याबाबतचे पासबुकवर संस्थेत येऊन अधिकाऱ्यांची सही घ्यावी.
- संस्थेच्या व सभासदांच्या हिताच्या दृष्टीने आपला सल्ला व मार्गदर्शन लेखी स्वरुपात कळवा.

## आमच्या ठेव योजना

रु. १.०० लाख मिळवा
**शुभकार्य ठेव योजना**
दरमहा रु. १२००/- भरा
फक्त ६६ महिन्यासाठी
संस्थेच्या प्रतिनिधी मार्फत

आपली रक्कम
**दामदुप्पट**
फक्त ८४ महिन्यात

**जेष्ठ नागरीकांसाठी पेन्शन**

## शाखा

**वाशी**
ए-३/७, सेक्टर - १५, मराठा भवन
मार्ग, वाशी, नवी मुंबई - ४००७०३.
फोन : २७८०२६५१ / २७८९९७४९

**नेरुळ**
साईप्रसाद शॉपिंग कॉम्प्लेक्स,
शॉप नं. २८, प्लॉट नं. १७,
सेक्टर-८, नेरूळ, नवी मुंबई - ७०६
फोन : २७७२६०५६

**पुणे**
सरस्वती मंगल कार्यालय,
पहिला मजला, सर्व्हे नं. २९/१,
पुणे-सातारा रोड, धनकवडी, पुणे
फोन : ०२०-३०९०६७४६

# ★ विद्यार्थी गुणगौरव समारंभाचे क्षणचित्रे ★



शैक्षणिक गुणगौरव समारंभात बक्षिस व प्रमाणपत्र देऊन गुणगौरव करताना मा. श्री. श्यामराव महाडीक, (सभागृहनेते न. मु. म. पा.), इतर मान्यवर व संस्थेचे पदाधिकारी




शैक्षणिक गुणगौरव समारंभ प्रमुख पाहुणे मा. श्री. श्यामराव महाडीक (सभागृहनेते न. मुं. म. पा.), मार्गदर्शक मा. श्री. कृष्णकांत शिंदे (अध्यक्ष नवी मुंबई विद्यालय वाशी) व संस्थेचे पदाधिकारी



संस्थेने आयोजित केलेल्या शैक्षणिक गुणगौरव समारंभास आवर्जून उपस्थित राहिलेले विद्यार्थी व पालक वर्ग.

# ★ संस्थेने आयोजित केलेले कर्मचारी प्रशिक्षण शिबीर ★




संस्थेने दि. २३ व २४ ऑक्टोबर २००३, रोजी आयोजीत केलेल्या कर्मचारी प्रशिक्षण शिबीरात कर्मचारी व दैनंदिन ठेव प्रतिनिधी यांना मार्गदर्शन करताना मा. श्री. नाना पाटील (संचालक रायगड जिल्हा सहकारी संघ)

याप्रसंगी संस्थेच्या कर्मचारी व दैनंदिन ठेव प्रतिनिधी यांना सहकार कायदे व आदर्श उपविधी या विषयी मार्गदर्शन करताना संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विजय मोरे





संस्थेचे ठेव संकलन मोहिमे अंतर्गत उत्कृष्ठ कार्य करणारे श्री. दत्तात्रय साळेकर यांचा "आदर्श दैनंदिन ठेव प्रतिनिधी" म्हणून सत्कार करताना प्रतिथयश उद्योजक मा. श्री. विठ्ठलशेठ धुमाळ, सोबत मा. श्री. प्रेमजीभाई पटेल (नामवंत बांधकाम व्यावसायीक) व संस्थेचे पदाधिकारी.

## ★ पारिजात संस्थेची सुसज्ज व संगणकीकृत शाखा कार्यालये ★



वाशी शाखा कार्यालय



नेरुळ शाखा कार्यालय



पुणे शाखा कार्यालय

# संस्थेने केलेल्या प्रगतीचा आढावा




| सन | १९९९-२००० | २०००-२००१ | २००१-२००२ | २०००-२००३ | २००३-२००४ |
|---|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | १७,८९,८००.०० | ३७,५०,६५०.०० | ५७,४०,५५०.०० | ७३,९६,५५०.०० | ७७,०३,८००.०० |
| गुंतवणूक | २२,७६,०००.०० | ४०,४०,०००.०० | ८०,९४,०००.०० | १,२५,४७,१३०.०० | १,९२,१३,९४८.०० |
| ठेवी | १,२१,७७,०६०.०० | २,७१,८१,६२०.०० | ३,८०,२८,४३९.०० | ४,६८,५६,२४८.०० | ६,५१,२१,७३२.०० |
| कर्जे | १,२२,७९,०६५.०० | २,६५,७९,९८६.०० | ३,८०,५६,०१२.०० | ४,४२,७३,५७३.०० | ५,६४,१७,५११.०० |
| खेळते भांडवल | १,५०,३८,३९६.०० | ३,४४,१९,०८८.०० | ५,१३,७६,७६४.०० | ६,५१,३८,२९५.०० | ८,७७,१७,८५३.०० |

प्रेषक :

सचिव

**पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.**

ए/३/७, सेक्टर – १५, मराठा भवन मार्ग,
वाशी, नवी मुंबई – ४०० ७०३.
फोन : २७८० २६५९, २७८९ ९७४९

बुक–पोस्ट

प्रति,

छपाई व डिझाईनींग : **सानष प्रिं. प्रेस**, मुंबई - २. © २२०१ ०६२२ / २२०६ ९६०७